## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. ३:- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ प्रशाळांसाठी विद्यापीठात दि. ४ डिसेंबर रोजी जिल्हास्तरीय आविष्कार-२०२५ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या प्रशाळांसाठी आयोजित आविष्कार स्पर्धेचे उद्घाटन सकाळी १०.३० वाजता होणार आहे. उद्घाटक म्हणून दालमिल असोसिएशनचे अध्यक्ष प्रेम कोगटा, अस्टेमो इंडिया प्रा.लि.चे डेप्युटी जनरल मॅनेजर योगेश हेबाळकर उपस्थित राहणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी तर प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, राज्यपाल नियुक्त व्य.प. सदस्य राजेंद्र नन्नवरे, प्रा. पवित्रा पाटील, प्रा. जयदीप साळवी, अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील उपस्थित राहतील.

आविष्कार – २०२५ स्पर्धेचे आयोजन दोन टप्प्यात करणार येणार आहे. पहिल्या टप्प्यात विद्यापीठ प्रशाळेंसाठी दि. ४ डिसेंबर रोजी व दि. ८ डिसेंबर रोजी जिल्हास्तरीय स्पर्धा जळगाव जिल्ह्याकरीता पी.आर. हायस्कूल सोसायटीचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धरणगाव येथे, धुळे जिल्ह्यासाठी झेड. बी. पाटील महाविद्यालय, धुळे येथे तर नंदुरबार जिल्ह्यासाठी विद्यापीठ संचलित कला विज्ञान महाविद्यालय, मोलगी व आदिवासी अकादमी नंदुरबार यांच्या संयुक्त विद्यमाने आदिवासी अकादमी, नंदुरबार येथे आविष्कार -२०२५ जिल्हास्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. यानंतर विद्यापीठस्तरीय स्पर्धा दि. ३० व ३१ डिसेंबर रोजी विद्यापीठात आयोजित केली जाणार आहे.

या स्पर्धेतील सहभागी व्हावे असे आवाहन प्रशाळेतील गटाकरीता प्रा.विशाल पराते व डॉ. संदीप भामरे यांच्याशी तर जळगाव जिल्ह्यातील महाविद्यालयीन स्तरासाठी प्राचार्य उदय जगताप, डॉ. दीपक बोंडे, डॉ. स्वप्नील खरे, धुळे जिल्ह्यासाठी प्राचार्य वर्षा पाटील, डॉ. रवींद्र महाले व डॉ. समाधान पाटील तर नंदुरबार जिल्ह्याकरीता प्रा.किशोर पवार, डॉ. स्मिता देशमुख, डॉ. योगेश राणे , उपसमन्वयक डॉ. अमरदीप पाटील व समन्वयक डॉ. नवीन दंदी , विद्यार्थी विकास संचालक स्पर्धेचे सचिव डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी केले आहे.

बातमी नं. २

जळगाव (प्रतिनिधी) दि. ३ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे विविध संघ स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे राजभवन यांच्या मार्गदर्शनाने दि. ४ ते ८ डिसेंबर रोजी होणाऱ्या क्रीडा महोत्सवासाठी दि. ३ डिसेंबर रोजी रवाना झाले.

विद्यापीठाचे खो-खो (पु. व म.), व्हॉलीबॉल (पु. व म.), बास्केटबॉल (पु. व म.), कबड्डी (पु. व म.), मैदानी (पु. व म.), बॅडमिंटन (पु. व म.), टेबल टेनिस (पु. व म.), बुध्दीबळ (पु. व म.) ह्या विविध संघातील ८१ पुरूष व ८१ महिला असे एकूण १६२ खेळाडू राजभवन यांच्या मार्गदर्शनाने दि. ४ ते ८ डिसेंबर रोजी होणाऱ्या क्रीडा महोत्सवासाठी स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे रवाना झाले आहेत. त्यात संघ व्यवस्थापक व प्रशिक्षक प्रा. आर.आर. सोनवणे, अमर हटकर, डॉ. राहूल कांबळे, प्रा. बालाजी सलगर, डॉ. नरेश बागल, डॉ. गोविंद मारतळे, डॉ. देवदत्त पाटील, प्रा. कुणाल चव्हाण, डॉ. शैलेश पाटील, डॉ.विजय पाटील, प्रा. क्रांती क्षीरसागर, प्रा. जुनेद काझी, डॉ. मुकेश पवार सोबत जाणार आहेत. यासंघाना व खेळाडूंना विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, व्य.प. सदस्या प्रा. सुरेखा पालवे व कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांनी शुभेच्छादिल्यात. अशी माहिती विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ.दिनेश पाटील यांनी कळविले आहे.

बातमी नं. ३

जळगाव (प्रतिनिधी) दि. ३ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात प्राध्यापक प्रबोधिनी अंतर्गत महात्मा फुले यांची उद्योजकता या विषयावार व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

या प्रसंगी प्रशाळेचे संचालक मा. प्रा. डॉ. म. सु. पगारे यांनी अध्यक्षस्थानी होते. तर प्रमुख अतिथी म्हणून पॅसिफीक कोचिंग क्लासेसचे संचालक कैलास पाटील होते. त्यांनी 'महात्मा फुले यांची उद्योजकता' या विषयावर व्याख्यानाची सुरूवात करुन उदयोग व उद्योजकता म्हणजे काय? अशा प्रश्नाने सैध्दांनिक भूमिका मांडली. एखादा व्यवसाय सुरू करणे म्हणजे उद्योजकता होय. उद्योजिकता म्हणजे कार्यप्रवण राहणे असाही कार्यप्रवण राहणे असाही अर्थ त्यांनी यावेळी सांगितला. महात्मा फुले यांचा परिचय करून देतांना पुण्यात येण्यापर्यंतचा ते सुरु करण्यापर्यंताचा सविस्तर प्रवास त्यांनी वर्णन करुन सांगितला. फुले हे उत्तम उद्योजक होते. त्यांनी त्यांच्या तत्कालीन काळात विविध उदयोगांना चालना दिली. सोने चांदीच्या छाप्यांची एजन्सी त्यांनी चालवली पुणे "कमर्शियल अँड कॉन्ट्रॅक्टिंग कंपनी" नावाची बांधकाम कंपनी सुरु करुन साधारणत: 2000 लोकांना रोजगार उपलब्ध करुन दिला. असे अनेक छोटे-मोठे सामाजिक दायित्व असणारे उदयोग फुलेंनी सुरु केले होते. महात्मा फुलेंचा आदर्श तरुणांनी घेणे गरजेचे आहे.

आपल्या अध्यक्षीय मनोगतातून प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. म.सु.पगारे म्हणाले, महात्मा फुले यांचा 'नीती' या शब्दावर अधिक भर होता. महात्मा फुलेंचे कार्य हे सत्य, सचोटी, व प्रमाणिकतेवर आधारित होते. शून्यातून विश्व निर्माण करणारा महामानव म्हणजेच महात्मा फुले त्यांच्या उद्योजकतेचे कार्यक्षेत्र अभ्यासक संशोधकांपासून उपेक्षित राहिल्याचे लक्षात येते.

व्याख्यानंतर प्रशाळेतील प्राध्यापकांनी वक्ते व अध्यक्ष यांना महात्मा फुलेंची उद्योजकता, सामाजिकता व तत्कालिन परिस्थिती यावर विविध प्रश्न विचारून व इतर विषयांवर सखोल चर्चा केली. डॉ. सुदर्शन भवरे, डॉ. दिपक खरात, कृष्णा संदानशिव, प्रतिभा गलवाडे, डॉ. प्रिती सोनी, खेमराज पाटील, जितेंद्र नाईक यांनी प्रश्न विचारून चर्चा अधिक खुलविण्याचा प्रयत्न केला. याप्रसंगी प्रशाळेतील प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रिती मनुचारी यांनी केले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: ३ डिसेंबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता



## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. ३: कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या पुण्यतिथी निमित्त दरवषी ३ डिसेंबर रोजी लेवा गणबोली दिन साजरा करण्यात येतो. यावर्षीही विद्यापीठात भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात समूह चर्चा अंतर्गत लेवा गण बोली दिन साजरा करण्यात आला.

यावेळी प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. म.सु. पगारे यांनी अध्यक्षस्थानी होते. प्रशाळेतील प्राध्यापक व संशोधक विद्यार्थ्यांनी अहिराणी, लेवा गण बोली, तावडी अशा बोलीवर सखोल व सविस्तर चर्चा केली. बहिणाबाईच्या कविता या अहिराणी आहेत की लेवा गण बोली मध्ये आहेत? असा संभ्रम अजूनही साहित्यिकांमध्ये आणि अभ्यासकांमध्ये दिसून येतो. बहिणाबाईच्या कविता हया लेवा गणबोली मध्येच असून त्यात तत्वज्ञानाचा समावेश सर्वाधिक दिसतो असा चर्चेचा सूर होता. प्रा. डॉ. म.सू. पगारे यांच्या मते लेवा गण बोली ही स्वयंभू बोली असून तिची स्वतंत्र ओळख आहे. बहिणाबाई चौधरो यांनी आपल्या कवितेतून ज्या बोलीचा वापर केला ती लेवा गणबोली आहे. आहिराणी बोली जरी खानदेशात मोठ्या प्रमाणात बोलली जात असली तरी लेवा बोलीने आपली स्वतंत्र ओळख टिकवून ठेवली आहे. खान्देशात जवळपास २४ बोली बोलल्या जातात त्यातील एक महत्त्वाची बोली म्हणजे लेवा गण बोली आहे. परंतु, काही अभ्यासक जाणीवपूर्वक अभ्यासकांमध्ये गैरसमज पसरवून लेवा गण बोलीचे अस्तित्व नाकारत आहेत. जशी आहिराणी, तावडी तशीच लेवा गण बोली आहे हे नाकारून चालणार नाही. प्रत्यक्ष अप्रत्यक्ष होणारी आक्रमणे भाषेच्या बाबतीत चुकीची असतात. समूह संख्येने अल्प असला तरी बोली भाषा ही टिकली पाहिजे. तिचे संवर्धन झाले पाहिजे, बोली भाषा जगल्या पाहिजेत, त्यासाठी बोली भाषेची संमेलने झाली पाहिजेत, बोली भाषेची चर्चा झाली पाहिजे असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी प्रशाळेतील प्राध्यापक डॉ. सुदर्शन भवरे, डॉ. दिपकरा संदानशिय, प्रतिभा गालवाडे, डॉ. प्रिती सोनी, डॉ. भारती सोनवणे व संशोधक विद्यापी खेमराज पाटील, महेश सुर्यवंशी नाईक यांनी लेवा गणोलीवर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार खेमराज पाटील यांनी केले.

**बातमी नं. २**

जळगाव (प्रतिनिधी) दि. ३: दिव्यांगाचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी व त्यांचा यथोचित सन्मान करण्यासाठी ३ डिसेंबर रोजी जागतिक दिव्यांग दिन म्हणून साजरा करण्यात येतो. याच दिनाच्या अनुषंगाने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिसरातील योगेश्वर पाटोल, सामाजिकशास्त्रे प्रशाळा व महेश सूर्यवंशी, भाषा अभ्यास प्रशाळा यांचा सन्मान भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राचे संचालक प्रा.डॉ. म.सु. पगारे यांच्या हस्ते करण्यात आला

बुध्दीच्या सामर्थ्यांवर दिव्यांग मात करीत असतात त्यामुळे त्यांच्या शारीरिक व्यंगत्याकडे न बघता त्यांना प्रोत्साहन देणे गरजेचे असते दिव्यांगाचा बाऊ न करता सतत कार्यशील राहून उच्च शिक्षण घेणे हे ध्येय असावे, असा मोलाचा सल्ला योगेश्वर पाटील यांनी यावेळी दिला. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ.म.सु पगारे म्हणाले की, दिव्यांग म्हणजे अपूर्णता नव्हे ती एक असाधारण शक्ती आहे. सरकारने दिव्यांगाना दिलेल्या सोयी सुविधांचा फायदा अपंग नसलेले स्वार्थी लोक करून घेतात ही खंत त्यांनी ह्यावेळी व्यक्त केली म्हणूनच खरे दिव्यांग व त्यांच्या गरजा ओळखून त्यांना सुविधा देणे सरकारची जबाबदारी आहे व त्यासाठी समाजही सजग झाला पाहिजे असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.
या सन्मान सोहळयाप्रसंगी प्रशालेतील प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार खेमराज पाटील यांनी केले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: ३ डिसेंबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता